वाचले क्र. १) जाहिरात क्र. ५८०/२०२० पत्र क्र.वायसीएमएच/७/कावि/१६३१/२०२० दि.०४/१२/२०२०
२)मा.अधिष्ठाता यांनी शिफारस केलेली निवड व प्रतिक्षा यादी
४) आदेश क्र. वायसीएमएच/७/कावि/३५/२०२१ दि.२५/०१/२०२१ चा मुळ नियुक्ती आदेश
४) मा.आयुक्त सो यांनी दि.२५/०१/२०२१ रोजीचा वाढीव पदे भरणेस मंजुर प्रस्ताव
५) मा. आयुक्त यांचेकडील दि. ११/०२/२०२१ रोजीचा मान्य प्रस्ताव

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८
यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालय
क्र.वायसीएमएच/७/कावि/१२६/२०२१
दिनांक-१५/०२/२०२१

विषय- यशवंतराव चव्हाण स्मृति रूग्णालयाकरीता एकत्रित मानधनावर तात्पुरत्या स्वरूपात लॅब टेक्निशियन(RTPCR), पुरूषकक्ष मदतनीस, व स्त्रीकक्ष मदतनीस पदांवर नियुक्ती आदेश देणेबाबत.....

आदेश,

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालयामध्ये रूग्णांचा वाढता व्याप विचारात घेता सध्या आवश्यक असलेले विविध १२ प्रकारची पदे एकत्रित मानधनावर ६ महिनेकरीता भरणेकामी उपरोक्त वाचले क्र.१ अन्वये दैनिक वृत्तपत्रात व मनपा संकेतस्थळावर जाहिरात प्रकटन प्रसिध्द करणेत आले असता सदर विविध पदांकरीता आलेल्या सर्व अर्जांची छाननी करून पात्र उमेदवारांच्या लेखीपरिक्षा दि.१९/१२/२०२० व दि.२०/१२/२०२० रोजी घेण्यात आलेल्या आहेत. सदर लेखीपरिक्षेच्या निकालाचे अवलोकन करून गुणवत्ता यादीनुसार उपरोक्त वाचले क्र.३ अन्वये गुणानुक्रमे व आरक्षणानुसार उमेदवारांची निवड व प्रतिक्षायादी तयार करणेत आलेली असून त्यामधून मे. उच्च न्यायालय मुंबई यांचे दि.२९/०१/२०२१चे आदेशानुसार ब्लड बँक कौन्सीलर-१, एम.एस.डब्ल्यु-१,डाटाएंट्री ऑपरेटर-४,डायलेसिस टेक्निशियन-१, फार्मासिस्ट-१, एक्स-रे टेक्निशियन-३, स्टाफनर्स-७, लॅब टेक्निशियन-२, पुरूषकक्ष मदतनीस-३ व स्त्रीकक्ष मदतनीस-३ असे एकूण-२६ मानधन पदे न्यायालयाचे पुढील आदेश प्राप्त होऊपर्यंत राखून ठेवून उपरोक्त वाचले क्र.४ अन्वये मंजुरी दिलेले वाढीव रिक्त पदे लॅब टेक्निशियन-०४ RTPCR, पुरूषकक्ष मदतनीस-१९, स्त्रीकक्ष मदतनीस-१६ पदे भरणेकामी सोबतचे निवडयादी प्रपत्र अ मध्ये नमुद केलेल्या एकूण ३९ उमेदवारांना तात्पुरत्या स्वरूपात मानधनावर उपरोक्त मुळ आदेशातील कालावधीच्या अंतिम दिनांकापर्यंत नियुक्ती आदेश निर्गत करून त्यास मा.स्थायी समिती सभेची कार्योत्तर मान्यता घेण्यात येईल.

सबब, मी आयुक्त पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी-४११०१८ या आदेशान्वये मा. अधिष्ठाता यांनी दक्षता व नियंत्रण विभागाकडील प्राप्त निकालानुसार व मे. न्यायालयाचे आदेशाचे अवलोकन करून वाढीव पदांवर उमेदवारांची गुणानुक्रमे व आरक्षणानुसार निवड करून सोबत जोडलेल्या प्रपत्र अ मधील एकूण ३९ उमेदवारांची रूग्णालयास तातडीने आवश्यकता असल्याने त्यांना आदेशाच्या दिनांक१५/०२/२०२१ पासून ते दि.१४/०८/२०२१ अखेर याकालावधीसाठी खालील अटी शर्तीस अधिन राहून तात्पुरत्या स्वरूपात नेमणुक देणेस मंजुरी देत आहे. सोबतचे निवडयादी प्रपत्र अ मध्ये नमुद केलेल्या ३९ उमेदवारांना देण्यात येणारे एकत्रित दरमहा मानधन त्यांच्या नावापुढे दर्शविणेत आलेले आहे.

**अटी व शर्ती-**

१) नियुक्त केलेल्या उमेदवारांचा नियुक्ती कालावधी संपुष्टांत आल्यानंतर सेवा समाप्तीबाबत स्वतंत्र आदेश निर्गत केले जाणार नाहीत. प्रस्तुतची मुदत संपल्यानंतर त्याचा या पदावरील नेमणुक संदर्भात कोणत्याही प्रकारचा हक्क व दावा राहणार नाही.

२) नेमणुक कालावधीत नियुक्ती अधिका-यांच्या नियत्रंणाखाली काम करावे लागेल. तसेच त्यांच्या सुचनांचे, निर्देशांचे वेळोवेळी पालन कराव लागेल. तसेच वेळोवेळी वरिष्ठ सांगतील ती कामे करावी लागतील.

३) नेमणुक कालावधी संपण्यापुर्वी नोकरी सोडावयाची झाल्यास त्यांनी एक महिना आगाऊ विनंतीपत्र द्यावे लागेल. तसे आगाऊ पत्र न दिल्यास त्यांच्याकडून एक महिन्यांचा मेहनताना वसुल करण्याचा अधिकार नियुक्ती अधिकारी यांना राहील. याबाबत कोणतेही प्रकारची तक्रार विचारात घेतली जाणार नाही.

४) नियुक्ती कालावधीत विनापरवाना, विनासुचना गैरहजर राहिल्यास तसेच कामकाज असमाधानकारक असल्याचे निर्दशनास आल्यास नियुक्ती कालावधीच्या कोणत्याही स्तरावर त्यांची सेवा समाप्ती करणेचा अधिकारी यांना राहील.

५) मानधनावरील कर्मचारी यांना सहा महिनेतून फक्त चार दिवस किरकोळ रजा देय राहील. व ही रजा किरकोळ रजा असल्याने ज्या त्या महिन्यात घ्यावी लागेल. अशी रजा संचयीत करून एकत्रितरित्या घेता येणार नाही. मात्र अपवादात्मक परिस्थीमध्ये अशाप्रकारे रजा देणेबाबत नियंत्रीत अधिकारी यांना शिफारस करता येईल. व त्यानुसार अन्य कारणास्तव गैरहजरी विनावेतनी करणेत येईल. व ही रजा पुढच्या महिनेत देणेबाबत विभागप्रमुखांना अधिकार राहतील.



Scanned with CamScanner

६) मानधनावर कितीही दिवस एकत्रित सेवा झाली तरी निश्चीत केलेल्या मानधनाव्यतिरिक्त वेतनवाढ अथवा अन्य कोणतेही भत्ते देय राहणार नाहीत. तसेच रजा प्रवावभत्ता, सानुगृह अनुदान व बोनस देय राहणार नाही.

७) नेमणुक कालावधी संपल्यानंतर त्यांना या पदावरील नेमणुक संबधीने कोणत्याही प्रकारचा हक्क दावा राहणार नाही. अशी सेवा एकूण (Aggregate) कितीही झाली तरी उमेदवारास सेवेत नियमित स्वरूपाची नेमणुक आपोआप मिळणार नाही.

८) आठवड्यातून फक्त एक दिवस रूग्णालयाच्या सोयीनुसार साप्ताहिक सुट्टी राहील. व सार्वजनिक सुट्टी/ राष्ट्रीय सुट्टीच्या दिवशी म्हणजेच ज्या सुट्टीच्या दिवशी बाह्य रूग्ण विभागाचे कामकाज बंद असते त्या दिवशी सुट्टी उपभोगता येईल. व सदरची सुट्टीच्या दिवशी बाह्य रूग्ण चालू असले तर पर्यायी रजा रूग्णालयाच्या सोयीनुसार देता येईल.

९) मानधावरील नेमणुक पुर्णपणे तात्पुरत्या हंगामी स्वरूपाची आहे. त्यामुळे कोणत्याही कायमपदी नेमणुकीचा हक्क राहणार नाही. व तशी अस्थापनेवर बेतनश्रेणीत नियुक्ती मिळावी म्हणून निवेदन सादर करता येणार नाही. किंवा तसा बाह्य दबाब आणार नाही. कोणत्याही मे. न्यायालयात दावा करता येणार नाही. याबाबत विहित नमुन्यात हमीपत्र सादर करावे लागेल.

१०) सदर मानधन कर्मचारी यांनी दररोज उपस्थीतीसाठी बायोमेट्रीक पध्दतीचा वापर करणए व हजेरी मस्टरवर दररोज स्वाक्षरी करणे बंधनकारक आहे. ज्या दिवशी बायोमेट्रीक व स्वाक्षरी नसेल त्या दिवसाचे मानधन अदा केले जाणार नाही.

११) नियमानुसार मानधनातून आयकर (TDS) कपात करून अंतिम रक्कम अदा करणेत येईल.

१२) कामावर वेळेवर हजर राहून ओळखपत्र व गणवेश परिधान करणे, तसेच वॉर्ड इनचार्ज व नियंत्रीत अधिकारी यांचे सुचनेनुसार कामकाज करणे बंधनकारक राहील.

१३) रूजू झालेवर रूजू अहवाल व फोटो तसेच १५ दिवसांचे आत बँक ऑफ बडोदा पिंपरी पी.सी.एम.सी शाखा येथे खाते उघडून त्यांचा क्रमांक व पॅनकार्डची झेरॉक्स व ई.सी.एस फॉर्म भरून संबधीत पगारबील लिपीक चाणक्य चाणक्य कार्यालयामध्ये सादर करावी.

१४) रूजू झालेल्या उमेदवारांना रूग्णालयाच्या सोयीनुसार शिफ्टप्रमाणे ड्युटी करणे बंधनकारक आहे.

१५) अर्जासोबत सादर केलेले अनुभव प्रमाणपत्र ग्राह्य धरले जाईल. नंतर दिलेला किंवा नंतर वाढलेला अनुभव सहा महिने पुर्ण होईपर्यंत ग्राह्य धरला जाणार नाही.

१६) आदेशाचे दिनांकापासून सात दिवसांचे आत रूजू न झाल्यास सदरची नेमणुक रद्द करणेत येईल. याबाबत कोणताही पत्रव्यावहार केला जाणार नाही. त्यानंतर कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही याची स्पष्ट नोंद घ्यावी.

१७) उपरोक्त अटी शर्ती निवड झालेल्या उमेदवारांस मान्य असलेने पदावर निवड झालेल्या पदावर तात्पुरत्या स्वरूपात काम करणेस तयार आहे. याबाबत विहित नमुन्यात हमीपत्र सादर करणे आवश्यक आहे.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८

प्रती

श्री/श्रीम.---------------------------------------

प्रत,

९) लेखा विभाग

१०) मेट्रन कार्यालय

११) सर्व्हररूम/ओटी विभाग

१२) संबधीत पगारबील लिपीक

२/- माहितीसाठी व पुढील कार्यवाही.

संबधीतांचे वेदन अदायकी करतांना थम्ब रिपोर्टवर संबधीत विभागाचे शाखाप्रमुखांचे स्वाक्षरी नसल्यास वेतन अदा करू नये याबाबत योग्य ती दक्षता घ्यावी.

अधिष्ठाता
य. च. स्मृती रूग्णालय पदव्युत्तर संस्था
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८



Scanned with CamScanner

पिंपरी चिंचवड महानगरपालिका पिंपरी-४११०१८
यशवंतराव चव्हाण स्मृती रूग्णालय

जाहिरात क्र.५८०/२०२० दि.०८/१२/२०२० अन्वये तयार करणेत आलेल्या गुणवत्ता यादीमधून रिक्त जागेवर गुणानुक्रमे व आरक्षणानुसार निवड झालेल्या लॅब टेक्निशियन (RTPCR) व पुरूषकक्ष कक्ष मदतनीस व स्त्रीकक्ष मदतनीस उमेदवारांची निवड यादी-

प्रपत्र अ

(नियुक्ती कालावधी दि.१५/०२/२०२१ ते दि.१४/०६/२०२१ अखेर)

| अ.क्र. | उमेदवाराचे नाव | प्रवर्ग | निवड प्रवर्ग | पदनाम | दरमहा मानधनर.रू |
|---|---|---|---|---|---|
| १ | आशा सुदाम सुपे | अ.जमाती | अ.ज निवड-१ | लॅब टेक्निशियन | २२९३४/- |
| २ | मधुरा नवनाथ लोंखडे | इ.मा.व | इमाव निवड-१ | लॅब टेक्निशियन | २२९३४/- |
| ३ | नम्रता गजाननराव राठोड | इ.मा.व | इमाव निवड-२ | लॅब टेक्निशियन | २२९३४/- |
| ४ | भावना पेत्राल जाधव | इ.मा.व | इ.मा.व निवड-३ | लॅब टेक्निशियन | २२९३४/- |
| ५ | प्रशांत बंडू खामकर | खुला | खुला- निवड-१ | पुरूषकक्ष मदतनीस | १९९५५/- |
| ६ | अनिकेत नारायण चिंचकर | इ.मा.व | खुला निवड-२ | पुरूषकक्ष मदतनीस | १९९५५/- |
| ७ | मारूती ज्ञानोबा चापके | इडब्ल्युएस | खुला निवड-३ | पुरूषकक्ष मदतनीस | १९९५५/- |
| ८ | विश्वास रामभाऊ खरात | अ.जाती | अ.जा निवड-१ | पुरूषकक्ष मदतनीस | १९९५५/- |
| ९ | भुषण बाबासाहेब भोसले | अ.जाती | अ.जा निवड-२ | पुरूषकक्ष मदतनीस | १९९५५/- |
| १० | नितेश रोहिदास भालशंकर | अ.जाती | अ.जा निवड-३ | पुरूषकक्ष मदतनीस | १९९५५/- |
| ११ | संजय भाऊसाहेब पवार | अ.जाती | अ.जा निवड-४ | पुरूषकक्ष मदतनीस | १९९५५/- |
| १२ | शांतीलाल शिलदार पावरा | अ.जाती | अ.ज निवड-१ | पुरूषकक्ष मदतनीस | १९९५५/- |
| १३ | कालीदास एकनाथ धूम | अ.जाती | अ.ज निवड-२ | पुरूषकक्ष मदतनीस | १९९५५/- |
| १४ | बंडू पांडुरंग आडे | वि.जा-अ | वि.जा-अ-१ | पुरूषकक्ष मदतनीस | १९९५५/- |
| १५ | आकाश सागर गवते | भ.ज-ब | भ.ज-ब नि-१ | पुरूषकक्ष मदतनीस | १९९५५/- |
| १६ | पंकज ज्ञानोबा ढाकणे | भ.ज-ड | भज-ड नि-१ | पुरूषकक्ष मदतनीस | १९९५५/- |
| १७ | सुरेश बाळू वाघ | वि.मा.प्र | विमाप्र नि-१ | पुरूषकक्ष मदतनीस | १९९५५/- |
| १८ | सागर देविदास रामेकर | इ.मा.व | इ.मा.व नि-१ | पुरूषकक्ष मदतनीस | १९९५५/- |
| १९ | अनिल छाबुलाल पाटील | इ.मा.व | इ.मा.व नि-२ | पुरूषकक्ष मदतनीस | १९९५५/- |
| २० | गोंविद धोंडीरामइरबटनवाड | इ.मा.व | इ.मा.व नि-३ | पुरूषकक्ष मदतनीस | १९९५५/- |
| २१ | अमोल हेमराज पाटील | इ.मा.व | इ.मा.व नि-४ | पुरूषकक्ष मदतनीस | १९९५५/- |
| २२ | किरण प्रकाश पाटील | इ.मा.व | इ.मा.व नि-५ | पुरूषकक्ष मदतनीस | १९९५५/- |
| २३ | ऋषिकेश शिवकांत कालेकर | इ.मा.व | इ.मा.व नि-६ | पुरूषकक्ष मदतनीस | १९९५५/- |
| २४ | वृषाली संजय बिबे | खुला | खुला निवड-१ | स्त्रीकक्ष मदतनीस | १९९५५/- |
| २५ | वैशाली अनिल घारे | खुला | खुला निवड-२ | स्त्रीकक्ष मदतनीस | १९९५५/- |
| २६ | प्रिया दादासो कदम | खुला | खुला निवड-३ | स्त्रीकक्ष मदतनीस | १९९५५/- |
| २७ | सगुणा मुंजाजी हेंडगे | खुला | खुला निवड-४ | स्त्रीकक्ष मदतनीस | १९९५५/- |
| २८ | अल्पा अंबादास पवार | खुला | खुला निवड-५ | स्त्रीकक्ष मदतनीस | १९९५५/- |
| २९ | अश्विनी माधव येलगटे | इ.मा.व | खुला निवड-६ | स्त्रीकक्ष मदतनीस | १९९५५/- |
| ३० | श्रध्दा सोपानराव पाखंडे | भ.ज-ब | खुला निवड-७ | स्त्रीकक्ष मदतनीस | १९९५५/- |
| ३१ | सुप्रिया संजय जमदाडे | अ.जाती | खुला निवड-८ | स्त्रीकक्ष मदतनीस | १९९५५/- |
| ३२ | रेखा केरबा त्रिभुवन | अ.जाती | अ.जाती नि-१ | स्त्रीकक्ष मदतनीस | १९९५५/- |
| ३३ | रूपाली अनुरथ वाघमारे | अ.जाती | अ.जाती नि-२ | स्त्रीकक्ष मदतनीस | १९९५५/- |



Scanned with CamScanner

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| ३४ | गायत्री नारायण भोपळे | अ.जाती | अ.जाती नि-३ | स्त्रीकक्ष मदतनीस | १९९५५/- |
| ३५ | कोमल विश्वनाथ सुरकुले | अ.जमाती | अ.जमाती नि-१ | स्त्रीकक्ष मदतनीस | १९९५५/- |
| ३६ | अनुष्का बालाजी घोडके | भ.ज-क | भ.ज-क नि-१ | स्त्रीकक्ष मदतनीस | १९९५५/- |
| ३७ | अंजना देविदास घोले | भ.ज-ड | भ.ज-ड नि-१ | स्त्रीकक्ष मदतनीस | १९९५५/- |
| ३८ | निलम विशाल वाळुंजकर | इ.मा.व | इ.मा.व नि-१ | स्त्रीकक्ष मदतनीस | १९९५५/- |
| ३९ | आरती अशोक अदवडे | इ.मा.व | इ.मा.व नि-२ | स्त्रीकक्ष मदतनीस | १९९५५/- |

आदेश क्र.वायसीएमएच/७/कावि/१२६/२०२१ दि.१५/०२/२०२१ चे लगत.

आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८



Scanned with CamScanner